MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

महापारेषण समाचार

■ वर्ष : १४ अंक : १ पाने : १२ ■ डिसेंबर २०१९-जानेवारी २०२० ■ E-Magazine visit us on : www.mahatransco.in

प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,

२०१९-२०२० या आर्थिक वर्षातील शेवटच्या तिमाहीत अधिक क्षमतेने आपण या वर्षाकरिता ठरविलेल्या लक्ष्यांना (Targets) प्राप्त करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न कराल, याची मला खात्री आहे. कंपनीतील प्रत्येक विभागाकरिता ठरवून दिलेली लक्ष्ये (Targets) गाठण्यात आपल्याला यश येईल, याबद्दल मी आशा बाळगतो. विविध धोरणात्मक निर्णय घेऊन आपण आपल्या कार्यप्रणालीमध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. त्याला भविष्यात चांगले यश मिळेल, याची मला खात्री आहे. यामध्ये सर्व अधिकारी

- **कामांचा नियमित आढावा घ्या**
- **कामांचे योग्य नियोजन करा**
- **विविध अडचणींवर मात करा**
- **सांघिक भावना कायम ठेवा**

व कर्मचाऱ्यांनी आपले मोलाचे योगदान देऊन सहकार्य केले आहे, हे विसरून चालणार नाही.

विकासाचा वेग पकडताना आपण आपली कार्यक्षमता वाढवून कामाची अधिक गुणवत्ता व वेग वाढविणे गरजेचा आहे. स्पर्धात्मक युगातही आपल्या आघाडीचा स्तर कायम ठेवण्याची जबाबदारी आपणा सर्वांवर आहे. वीज पारेषण क्षेत्रात महाराष्ट्र राज्य नेहमीच अग्रेसर आहे. विविध योजना व तंत्रज्ञानाचा वापर अधिक सहजतेने करण्याचा आपला मानस असला पाहिजे. त्याप्रमाणेच महापारेषणने नेहमीच नवे तंत्रज्ञान व आधुनिक प्रणालीचा वापर केला आहे. त्या सर्व प्रयत्नांचा आपल्या कंपनीच्या प्रगतीमध्ये मोलाचा वाटा आहे.

कंपनीची प्रगती करणे ही जशी व्यवस्थापनाची जबाबदारी आहे, तशीच ती प्रत्येक अधिकारी, अभियंता व कर्मचाऱ्यांची देखील आहे. सर्व कर्मचारी हे संघटनात्मक स्तरावर आपले संपूर्ण कौशल्य पणाला लावून या कंपनीच्या प्रगतीत मोलाचा हातभार लावू शकतात. महापारेषणचे कर्मचारी हे त्यांच्या विशेष तांत्रिक ज्ञानाने व कुशलतेने परिपूर्ण आहेत. अनुभवी कर्मचारी मोठ्या कुशलतेने आपली यंत्रणा सांभाळण्याचे काम करत आहेत, याची मला खात्री आहे.

प्रशासन कालबध्द पध्दतीत परिमंडळाची आढावा बैठक घेत आहे. त्यामुळे याचा फायदा यंत्रणेला चालना देण्यास होत आहे. आपण केलेल्या विविध कामांचे सादरीकरण प्रशासनासमोर करण्याची संधी आपणास या बैठकांमधून मिळते, याचा आपण अधिकाधिक उपयोग करून घ्यावा, असे मला वाटते. क्षेत्रीय कार्यालयांना कोणत्या प्रकारची मदत किंवा साधनसामुग्रीची गरज असेल तर ते समजून घेऊन त्यावर योग्य ती उपाययोजना या बैठकांतून करता येते. प्रत्येक वरिष्ठ कार्यालयाने त्यांच्याअंतर्गत असलेल्या कनिष्ठ कार्यालयांशी अशाच प्रकारच्या बैठकांच्या माध्यमातून समन्वय साधून कंपनीच्या एकंदरीत कार्यक्षमता वाढविण्यास हातभार लावला पाहिजे, असे मला वाटते.

सुयोग्य व्यवस्थापनाकरिता कोणतेही काम हे वेळ व कामाचे विभाजन या दोन घटकांत मोजणे गरजेचे ठरते. त्यासाठी विविध माध्यमांतून आढावा बैठक घेतली जाते. त्यासाठी कामाचे योग्य व्यवस्थापन हे परिमंडळ, मंडळ व उपमंडळ अशा विविध पातळींवर सुक्ष्मपणे होणे गरजेचे आहे. त्याकरिता आपल्या कर्मचाऱ्यांचा अनुभव व अंमलबजावणी क्षमतेचा चांगला उपयोग करून घेणे गरजेचे ठरते. सांघिक कार्यालय हे महापारेषणचा अतिमहत्त्वाचा भाग आहे. काम आणि कामांचे अनुकरण याबाबत कार्यालयाने उत्तम उदाहरण घालून दिले पाहिजे. हे कार्यालय मानकीकरण व सुस्पष्ट मार्गदर्शक तसेच कार्यासंदर्भातील नामांकने क्षेत्रीय कार्यालयाकरिता तयार करते. उत्पादकता व परिणाम, वेळेवर प्रस्तावांची मंजुरी यामध्ये प्रत्येकाची भूमिका महत्त्वाची आहे.

देशाचे नियोजन हे प्रत्येक राज्याच्या नियोजनात्मक कामगिरीवर देखील अवलंबून असते. विविध प्रकल्पांची कामे वेळेत व गुणवत्तापूर्ण करून आपण देशकार्यात हातभार लावत असतो. महापारेषणच्या विविध प्रकल्पांची कामे योग्यरित्या सुनियोजन करून पूर्ण करणे, हे आपले महत्त्वाचे कार्य आहे. महत्त्वाकांक्षी टप्पे गाठताना यंत्रणेचे मजबुतीकरण, सुव्यवस्था व अपघातशून्य कार्यक्षेत्र हे घटकसुध्दा तितकेच महत्त्वाचे असतात. कोणतीही

दिनेश वाघमारे (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

जोखीम न घेता निर्देशित केलेल्या कार्यप्रणालीनुसार काम करणे गरजेचे असते.

आज वीजक्षेत्रामध्ये बऱ्याच आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. ग्राहकांना त्यांच्या गरजेनुसार गुणवत्तापूर्ण सेवा देण्यास आपण कटिबध्द असले पाहिजे. विविध आव्हाने लक्षात घेऊन त्यावर मात करण्यासाठी आपण सदैव तत्पर असले पाहिजे. आधुनिकीकरणाची गती वाढत असतानाच गुणवत्ता, कार्यतत्परता व कामाप्रती निष्ठा ठेऊन काम पूर्णत्वास नेणे, हे अत्यंत महत्त्वाचे आहे. सांघिक यशाकरिता सकारात्मकता, नवनवीन गोष्टी शिकण्याची आस व निरंतर सुधारणेसाठी प्रयत्न. या तिन्ही गोष्टी आपल्या कंपनीच्या यशस्वी वाटचालीसाठी गरजेच्या आहेत.

कामांचा नियमित आढावा, सूत्रबध्द नियोजन, विविध आव्हानांशी सामोरे जाण्याची तयारी व विविध अडचणींवर वेळेवर लक्ष देऊन संसाधनांचा योग्य समन्वय साधून त्या दिशेने काम करण्यासाठी सांघिक भावनेने सर्वांना प्रोत्साहित करावे, याकरिता मी सर्वांना मनापासून आवाहन करतो.

शुभेच्छांसह..!

– दिनेश वाघमारे
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

नवे मंत्रिमंडळ

■ दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी पुढाकार ■

ना. डॉ. नितीन राऊत यांनी स्वीकारली ऊर्जामंत्रिपदाची सूत्रे

■ *टीम महापारेषण, मुंबई*

ना. डॉ. नितीन काशिनाथ राऊत यांनी राज्याच्या ऊर्जामंत्रिपदाची सूत्रे नुकतीच स्वीकारली. डॉ. राऊत उच्चविद्याविभूषित असून त्यांनी एम.ए.एफ., बी.एम.सी.पी.एल., एम.एफ.ए. (नाट्य) व पीएच.डी या पदव्या संपादित केल्या आहेत. डॉ. नितीन राऊत हे नागपूर (उत्तर) या विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करतात.

डिसेंबर २००८ ते नोव्हेंबर २००९ या काळात गृह, तुरूंग, राज्य उत्पादन शुल्क व कामगार खात्याचे राज्यमंत्री तर २०१४ मध्ये रोजगार हमी योजना आणि जलसंधारण विभागाचे मंत्री म्हणून कार्यरत होते. त्यापूर्वी त्यांच्याकडे पशुसंवर्धन, दुग्ध आणि मत्स्य व्यवसाय

विकास या विभागाचेही मंत्रिपद होते. ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड होऊन राज्याच्या ऊर्जामंत्रिपदाची जबाबदारी त्यांच्याकडे आली आहे.

ना. डॉ. राऊत हे दरवर्षी संकल्प संस्थेमार्फत समाजातील दुर्बल घटकांच्या कल्याणाच्या कार्यात सहभागी आहेत. याशिवाय, दरवर्षी धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या सोहळ्यासाठी नागपुरातील पवित्र दीक्षाभूमीला भेट देणाऱ्या भाविकांसाठी मुलभूत सुविधा पुरवण्यासाठीही ते सक्रिय असतात. त्यांच्यासाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करतात. त्यांचा मराठवाडा नामांतर आंदोलनात सक्रिय सहभाग होता. सलग १९९९-२००४, २००४-२००९, २००९-२०१४ या काळात विधानसभा सदस्य, विधिमंडळाच्या अनुसूचित जाती कल्याण समितीचे सदस्य, आरक्षण अधिनियम समितीचे सदस्य, विधानमंडळाच्या रोजगार व स्वयंरोजगार समितीचे सदस्य म्हणून कार्य केले आहे.

नवे मंत्रिमंडळ

■ महिला, युवकांना रोजगारांच्या संधी देण्यात अग्रेसर ■

ना. श्री. प्राजक्त तनपुरे यांनी स्वीकारला ऊर्जा राज्यमंत्री म्हणून पदभार

■ *टीम महापारेषण, मुंबई*

ना. श्री. प्राजक्त प्रसादराव तनपुरे यांच्याकडे ऊर्जा (राज्यमंत्री) खात्याची जबाबदारी देण्यात आली आहे. याचबरोबर नगरविकास, उच्च व तंत्रशिक्षण, आदिवासी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन खात्यांचे काम ना. श्री. प्राजक्त तनपुरे पाहणार आहेत. अमेरिकेतील टुलसा, ओक्लाहोमा विद्यापीठातून अभियांत्रिकी विषयात पदव्युत्तर

पदवी (एम. एस.) पूर्ण केली आहे. ना. श्री. प्राजक्त तनपुरे हे राहुरी (जि. अहमदनगर) या विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करतात.

अमेरिका येथील विद्यापीठातून उच्चविद्याविभूषित आणि राजकीय वारसा लाभलेले ना. श्री. प्राजक्त तनपुरे हे राजकीय आणि सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर राहिले आहेत. महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासोबतच युवकांची फळी उभारून त्यांनी सामाजिक कार्याला सुरूवात केली. २०१६ मध्ये राहुरीचे पहिले नगराध्यक्ष होण्याचा बहुमान त्यांना मिळाला. ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर निवड होऊन राज्याच्या ऊर्जा (राज्यमंत्री) पदाची जबाबदारी त्यांच्याकडे आली आहे.

प्रगतिपथावर असलेली कामे

कळमेश्वर-कुडूस वाहिनी

CMD, MSETCL

■ व्यवस्थापन व प्रशासन क्षेत्रातील मोठा अनुभव ■

महापारेषणच्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकपदी श्री. दिनेश वाघमारे

■ टीम महापारेषण, सांघिक कार्यालय

श्री. दिनेश वाघमारे (आय.ए.एस.) हे महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (महापारेषण) चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक म्हणून दि. २३.०१.२०२० रोजी रुजू झाले आहेत. ते १९९४ च्या बॅचचे वरिष्ठ सनदी अधिकारी आहेत. त्यांनी श्री. पराग जैन नानोटिया (आय.ए.एस) यांच्याकडून नुकताच पदभार घेतला आहे. श्री. पराग जैन नानोटिया (आय.ए.एस.)

यांची सचिव, सामाजिक न्याय विभाग, महाराष्ट्र शासन येथे नियुक्ती झाली आहे. महापारेषणमध्ये रुजू होण्यापूर्वी श्री. वाघमारे हे प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, महाराष्ट्र शासन म्हणून कार्यरत होते.

श्री. दिनेश वाघमारे यांना व्यवस्थापन व प्रशासन क्षेत्रातील २६ वर्षांपेक्षा अधिक अनुभव आहे. त्यांनी बी. ई. (इलेक्ट्रॉनिक्स) विश्वेश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थेतून (व्हीएनआयटी) केले आहे.

ते आय.आय.टी. खरगपूरचे एम.टेक. (कॉम्प्युटर सायन्स) इंजिनिअर आहेत. इंग्लंडच्या ब्रॅडफोर्ड विद्यापीठातून त्यांनी विकास आणि प्रकल्प नियोजन या विषयातून एम.एस्सी. केले आहे. त्यांना संघबांधणी, प्रकल्प नेतृत्व, प्रशासन आणि व्यवस्थापन यांचा मोठा अनुभव आहे.

थेट-भेट

■ विविध कामांची केली पाहणी ■

कळवा ग्रहण केंद्रास अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांनी दिली भेट

■ टीम महापारेषण, नांदेड

तामसा उपकेंद्रामध्ये (जि.नांदेड) १३२ के.व्ही. भोकर–तामसा एकदल वाहिनीचे काम युध्दपातळीवर पूर्ण करून वाहिनी व 'बे' कार्यान्वित करण्यात आला.

नांदेड जिल्ह्यातील विजेचा तुटवडा आणि दिवसेंदिवस मागणीत होणारी सततची वाढ लक्षात घेता १३२ के.व्ही. वाघाला-तामसा एकदल वाहिनी लांबी ४९ कि.मी. ची सद्यस्थितीमध्ये १३२ के.व्ही. तामसा उपकेंद्रास वीजपुरवठा करीत होती. दुसरी वैकल्पिक वाहिनी १३२ के.व्ही. तामसा उपकेंद्रास नसल्यामुळे सदरील वाहिनीवर विजेचा अतिरिक्त भार येत होता. त्यासाठी पर्यायी वाहिनी आवश्यक होती.

दरम्यान, १३२ भोकर–तामसा एकदल वाहिनी कार्यान्वित झाल्यामुळे विजेच्या मागणीनुसार पारेषणप्रणाली सक्षम झाली आहे. त्यामुळे ५० MW हे २२० के.व्ही. भोकर उपकेंद्रातून पुरविला जात आहे. उपकेंद्रामुळे किनवट (जि.नांदेड), हिमायतनगर (जि. नांदेड) या टोकाच्या तालुक्यातील पाच ते सहा के.व्ही. व्होल्टेजमध्ये वाढ झाली आहे. वाहिनी व 'बे' काम पूर्ण करण्यासाठी मुख्य अभियंता (प्रभारी) सर्वश्री महेंद्र वाळके, अधीक्षक अभियंता अनिल भारसाखळे, कार्यकारी अभियंता (प्रभारी) संजय लोंढे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता संजय नलबलवार, अतिरिक्त कार्यकारी अभियंता संजय महाले, सहायक अभियंता रविप्रकाश मिश्रा, अभय चंद, प्रशांत नाईकवाडे, जयश्री उपासे, रिजवाना पठाण, नयन शेळके, अश्पाक अहमद, माधव सोनकांबळे यांनी परिश्रम घेतले.

कळवा : वाशी परिमंडळातील ४०० के. व्ही. कळवा ग्रहण केंद्रास महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांनी भेट देऊन कामाची पाहणी केली. याप्रसंगी संचालक (संचलन) सर्वश्री संजय ताकसांडे, कार्यकारी संचालक (पारेषण) श्रीकांत राजूरकर, वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता नासीर कादरी, अधीक्षक अभियंता सुनील सूर्यवंशी, महेश भागवत, जगन्नाथ चुडे, भूषण बल्लाळ व अन्य अधिकारी.

प्रगतिपथावर असलेली कामे

बाभळेश्वर-कुडूस वाहिनी

औरंगाबाद : येथील आंतरपरिमंडळीय क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन करताना जिल्हा क्रीडा अधिकारी सर्वश्री अशोक गिरी, शेजारी मुख्य अभियंता (प्रभारी) महेंद्र वाळके, संदीप हाके, रंगनाथ चव्हाण, श्री. रंगनाथ शेळके व अन्य.

■ वाशी परिमंडळाने पटकाविले सर्वसाधारण उपविजेतेपद ■

आंतरपरिमंडळीय क्रीडा स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपद औरंगाबादकडे

■ *टीम महापारेषण, औरंगाबाद*

महापारेषणच्या आंतरपरिमंडळीय क्रीडा स्पर्धा औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या क्रीडांगणावर उत्साहात पार पडल्या. यामध्ये औरंगाबाद परिमंडळाने सर्वसाधारण विजेतेपद तर वाशी परिमंडळाने उपविजेतेपद पटकाविले.

स्पर्धेचे उद्घाटन पोलीस अधीक्षक (औरंगाबाद ग्रामीण) श्रीमती मोक्षदा पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी अध्यक्षस्थानी महापारेषणचे कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे उपस्थित होते. याप्रसंगी मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील, अमरावती परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. रोहिदास मस्के, वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. नासीर कादरी, औरंगाबाद परिमंडळाचे मुख्य अभियंता (प्रभारी) श्री. महेंद्र वाळके उपस्थित होते.

सांघिक खेळ प्रकारात कबड्डी खेळात कराड परिमंडळ, व्हॉलीबॉल व क्रिकेट खेळात वाशी, टेबल टेनिसमध्ये सांघिक कार्यालय, बॅडमिंटन खेळात नागपूर परिमंडळ, कॅरम गटात औरंगाबाद परिमंडळ तर ब्रिज खेळात कराड परिमंडळाच्या चमूंनी प्रथम क्रमांक पटकाविला. पारितोषिक वितरण समारंभ महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे व संचालक (वित्त) श्री. विनायक साठे यांच्या हस्ते झाला. याप्रसंगी मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील व सर्व परिमंडळाचे मुख्य अभियंता उपस्थित होते.

या स्पर्धेमध्ये कबड्डी, व्हॉलीबॉल, क्रिकेट, टेबल टेनिस, बॅडमिंटन, ब्रिज, बुध्दीबळ आणि कॅरम या सांघिक खेळाबरोबरच ऍथलेटिक्स, कुस्ती आणि महिलांच्या विविध क्रीडास्पर्धांचा यामध्ये सहभाग होता.

यामध्ये यजमान औरंगाबाद परिमंडळाच्या चमूबरोबर अमरावती, नाशिक, नागपूर, वाशी, पुणे, कराड परिमंडळाच्या आणि सांघिक कार्यालयाच्या पुरुष व महिला खेळाडूनी सहभाग घेतला.

स्पर्धेचा लोगो, सेल्फी पॉईंट, ऑनलाईन स्कोअर व्यवस्था, फेसबूक तसेच ड्रोन कॅमेरा आदी नावीन्यपूर्ण कल्पना आयोजकांनी राबविल्या. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी सर्वश्री अनंत पाटील, औरंगाबाद परिमंडळाचे मुख्य अभियंता (प्रभारी) महेंद्र वाळके, अधीक्षक अभियंता अनिल भारसाकळे, रंगनाथ चव्हाण, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) (प्रभारी) चंद्रशेखर बोराडे, सहाय्यक महाव्यवस्थापक (वित्त) प्रवीण यशवंते यांच्यासह कार्यकारी अभियंता, सहाय्यक मुख्य दक्षता अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

प्रगतिपथावर असलेली कामे

पडघा-तारापूर लिलो पध्दतीने वाहिनी

अलिबाग : मराविमं अधिकारी संघटनेच्या ४३ व्या राज्यस्तरीय अधिवेशनाचे उद्घाटन रायगड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. अनिल पारसकर यांनी केले. याप्रसंगी महापारेषणचे कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) सर्वश्री सुगत गमरे, महापारेषणचे संचालक (वित्त) (प्रभारी) अनिल कालेकर, महावितरणचे सतीश तळणीकर, संजय ढोके, महापारेषणचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी अनंत पाटील, विकास आढे, डी. आर. शिंदे, प्रवीण बागूल.

■ राज्यभरातील सभासदांची मोठी उपस्थिती ■

मराविमं अधिकारी संघटनेच्या अधिवेशनाचे थाटात उद्घाटन

■ *टीम महापारेषण, अलिबाग*

महावितरण, महापारेषण व महानिर्मिती वीज कंपन्यांमधील मराविमं अधिकारी संघटनेच्या ४३ व्या राज्यस्तरीय अधिवेशनाचे अलिबाग येथे थाटात उद्घाटन झाले. 'वीज कंपन्या तांत्रिक स्वरुपाच्या असल्या तरी अतांत्रिक अधिकाऱ्यांची भूमिका व योगदान महत्त्वाचे आहे', असे मत रायगड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. अनिल पारसकर यांनी उद्घाटक म्हणून व्यक्त केले.

अधिवेशनाच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापारेषणचे कार्यकारी संचालक (मानव संसाधन) (प्रभारी) श्री. सुगत गमरे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून महापारेषणचे संचालक (वित्त) (प्रभारी) श्री. अनिल कालेकर, महावितरणचे मुख्य महाव्यवस्थापक (वित्त) सतीश तळणीकर, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी संजय ढोके, महापारेषणचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील, अधिकारी संघटनेचे अध्यक्ष श्री. विकास आढे, सरचिटणीस श्री. डी. आर. शिंदे आणि संघटन सचिव श्री. प्रवीण बागूल आदींची उपस्थिती होती. यावेळी पोलीस अधीक्षक श्री. पारसकर म्हणाले, ``वीज ही आता मुलभूत गरजेची झाली आहे. अतांत्रिक अधिकारी हे तांत्रिक कंपनीमध्ये सहाय्यभूत व आधारभूत घटक आहेत. कंपनी अंतर्गत कामकाज आणखी गतिमान करण्यासाठी नवीन तंत्रज्ञान स्वीकारावे तसेच अधिवेशनामध्ये चांगल्या संकल्पनांची देवाणघेवाण करावी.`` यावेळी महापारेषणचे कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे म्हणाले, ``सध्या वीजक्षेत्रातील आव्हानांचे स्वरुप बदलत आहे. या नव्या आव्हानांचा स्वीकार करणे अपरिहार्य आहे. दैनंदिन कामकाजामध्ये नव्या संकल्पनांचा वापर करणे, नावीन्यपूर्ण कामकाज गतिमान करणे या आधारे या नव्या आव्हानांना सहज सामोरे जाता येईल.``

अधिकारी संघटनेचे सरचिटणीस श्री. दिलीप शिंदे यांनी वीजकंपन्यांचे बदलते स्वरुप व त्यायोगे अतांत्रिक अधिकाऱ्यांची जबाबदारी व संघटनेची भूमिका स्पष्ट केली. यावेळी संघटनेचे अध्यक्ष श्री. विकास आढे यांच्यासह उपस्थित प्रमुख पाहुण्यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहाय्यक महाव्यवस्थापक श्री. सुनील पाठक यांनी केले. सूत्रसंचालन श्री. शिवाजी तिकांडे यांनी तर आभार शंकर गोसावी यांनी मानले. या अधिवेशनासाठी राज्यभरातून मोठ्या संख्येने अधिकारी उपस्थित होते.

प्रगतिपथावर असलेली कामे

जेजुरी-हिंजेवाडी दुहेरी परिपथ वाहिनी

■ अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती ■

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनी अभिवादन

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनानिमित्त सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

सुरूवातीला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस महापारेषणचे संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. ``भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडलेले विचार सर्वांनी आचरणात आणले तर खऱ्या अर्थाने त्यांना आदरांजली ठरेल.``, असे विचार मान्यवरांनी व्यक्त केले.

याप्रसंगी संचालक (वित्त) सर्वश्री विनायक साठे, संचालक (संचलन) संजय ताकसांडे, सल्लागार डॉ. संजय कुलकर्णी, कार्यकारी संचालक (पारेषण) श्रीकांत राजूरकर, कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (विवले) अनिल कालेकर, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) संजय कुमार, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी अनंत पाटील, मुख्य अभियंता आर.एल.गायकवाड, मोतीसिंह चौहान, मुख्य विधी सल्लागार शिवाजीराव पाटील, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) मंगेश शिंदे, शेखर सावळे यांचेसह अन्य अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार कार्यकारी अभियंता श्री. महेंद्र वाकळे यांनी मानले.

मुंबई : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करताना महापारेषणचे संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण. शेजारी संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे.

प्रगतिपथावर असलेली कामे

बाळापूर-पारस वाहिनीवर लिलो पध्दतीने उभारणी

चैत्यभूमी, मुंबई : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनानिमित्त चैत्यभूमीवर जमलेल्या अनुयायांना मोफत पाणी, नाश्ता वाटप करताना महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे, महाव्यवस्थापक (मा. सं. आस्थापना) श्री. राजू गायकवाड, मुख्य अभियंता श्री. अनिल कोलप व अन्य अधिकारी.

■ महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचा पुढाकार ■

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनी चैत्यभूमीवर मोफत पाणीवाटप

■ *टीम महापारेषण, मुंबई*

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६३ व्या महापरिनिर्वाणदिनानिमित्त महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्या वतीने अभिवादन करण्यात आले. चैत्यभूमीवर जमलेल्या लाखो अनुयायांना मोफत पाणी, नाश्ता व मास्क वाटप करण्यात आले.

सुरूवातीला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष श्री. संजय घोडके, महापारेषणचे महाव्यवस्थापक (मा.सं.आस्थापना) श्री. राजू गायकवाड उपस्थित होते. यशस्वी नियोजनासाठी महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटन महावितरण, महापारेषण व महानिर्मिती मुंबई शाखा यांच्याकडून आर्थिक निधी प्राप्त झाला. यासाठी प्रकाशगंगा शाखेचे अध्यक्ष श्री. जयंत कांबळे, सचिव श्रीमती रंजना खैरे, श्री. रविकिरण जांभूणकर, श्री. पंकज बोरकर, श्री. रोहन मुडशिंगीकर, श्रीमती निशिगंधा बनकर, श्री. आनंद गायकवाड, श्री. निशांत कांबळे, श्री. संदीप धाबर्डे, श्री. बाबासाहेब कांबळे, श्रीमती नेहा जांभूणकर, श्री. गौतम कांबळे, श्री. लिलेश डहाका तसेच शाखेचे पदाधिकारी व सदस्यांनी सहकार्य केले.

चैत्यभूमी, मुंबई : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनानिमित्त चैत्यभूमीवर जमलेल्या अनुयायांना महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्या वतीने मोफत पाणी, नाश्ता वाटप करण्यात आले. याप्रसंगी अधिकारी व कर्मचारी.

प्रगतिपथावर असलेली कामे

बाभळेश्वर-कोपरगाव वाहिनीवर लिलो पध्दतीने उभारणी

वंदन ज्ञानज्योतीला...

■ अधिकारी व कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती ■

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महाराष्ट्र महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १८९ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले.

सुरूवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. पराग जैन नानोटिया यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण, संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे, कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. अनिल कालेकर, महाव्यवस्थापक (मा.सं.तां.), श्री. सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (मा.सं.आस्थापना) श्री. राजू गायकवाड, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. अनंत पाटील, मुख्य अभियंता श्री. शशांक जेवळीकर, शिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव यांचेसह विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी संचालक (प्रकल्प) श्री. रवींद्र चव्हाण, संचालक (संचलन) श्री. संजय ताकसांडे, कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे, यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर माहिती सांगितली. प्रारंभी

कार्यकारी अभियंता श्री. श्रीकांत पेटकर, अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्रीमती मयांका ओमर, श्रीमती नम्रता पाटील यांनी सावित्रीबाई फुले यांचा जीवनपरिचय व त्यांच्या कार्याची माहिती दिली. याप्रसंगी कार्यकारी अभियंता श्रीमती वर्षा शिंदे, श्री. तेजस टिकले, श्री. रविकिरण जांब्रुणकर, श्रीमती प्रेमा कुरकुटे यांनी `सावित्रीबाई फुले यांच्या स्वप्नातील कुटुंब कसे असावे`, या विषयावर नाट्य सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार भारती कांबळे यांनी मानले.

कामगार जगत

इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनच्या १९ व्या राज्यस्तरीय अधिवेशनाचे थाटात उद्घाटन

■ *टीम महापारेषण, सांगली*

महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनचे १९ वे राज्य अधिवेशन सांगली येथे पार पडले. प्रारंभी संघटनेचे अध्यक्ष व ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव काँ. मोहन शर्मा यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी महापारेषण कंपनीचे कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे, कार्याध्यक्ष काँ. सी. एन. देशमुख, सरचिटणीस काँ. कृष्णा भोयर, अतिरिक्त सरचिटणीस काँ. महेश जोतराव, महापारेषण कंपनीचे महाव्यवस्थापक (मा.सं. मनुष्यबळ नियोजन) श्री. सुधीर वानखेडे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते

अधिवेशनाची सुरूवात कामगार नेते व संघटनेचे माजी अध्यक्ष कै. काँ. ए. बी. बर्धन, काँ. दत्ता देशमुख, काँ. श्याम केरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार व मशाल पेटवून

सांगली : इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनचे १९ वे राज्य अधिवेशन सांगली येथे पार पडले. याप्रसंगी संघटनेचे अध्यक्ष काँ. मोहन शर्मा. शेजारी महापारेषणचे कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे, कार्याध्यक्ष काँ. सी. एन. देशमुख, सरचिटणीस काँ. कृष्णा भोयर, अतिरिक्त सरचिटणीस काँ. महेश जोतराव, महापारेषण कंपनीचे महाव्यवस्थापक (मा.सं. मनुष्यबळ नियोजन) श्री. सुधीर वानखेडे यांच्यासह अन्य संघटनेचे पदाधिकारी.

उद्घाटन महापारेषणचे कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) श्री. सुगत गमरे व संघटनेचे पदाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले. श्री. महेश जोतराव यांनी स्वागतपर भाषण केले. सरचिटणीस काँ. कृष्णा भोयर यांनी प्रास्तविक करताना संघटनेचा तीन वर्षाचा अहवाल सादर केला. सोडविलेले प्रश्न, प्रलंबित प्रश्न, खासगीकरण व फ्रेन्चाईसी संघटनात्मक बांधणी याबाबत विस्तृत अहवाल सादर केला.

यावेळी श्री. सुगत गमरे म्हणाले, ``शेतकरी व कामगार हा देशाचा कणा आहे. त्यांच्या श्रमामुळे देश घडला आहे. वर्कर्स फेडरेशन ही संघटना विद्युत मंडळाच्या निर्मितीपूर्वी तयार झाली आहे. गेली ६० वर्षे अविरतपणे वीजकामगार हितासाठी फेडरेशन लढा देत आहे, ही अभिमानाची बाब आहे. वीजकंपन्या व कामगार संघटना यांच्या संयुक्त प्रयत्नातून चांगली मेडिक्लेम योजना सुरु आहे.``

काँ. मोहन शर्मा म्हणाले, ``ऊर्जा उद्योगाची स्थिती, सतत होणारी वीज दरवाढ रोखणे याकरिता उपाययोजना, वीज कंपन्यांचे खासगीकरण व फ्रेन्चाईसीकरण रोखणे, वीज कंपन्यातील कंत्राटी, आऊट-सोर्सिंग व सुरक्षारक्षक कामगार यांना कायम करण्याचा प्रश्न, तिन्ही वीज कंपन्यातील ४० च्या वर रिकाम्या जागा भरणे, २००८ ला राज्य सरकारने मंजूर केलेली पेन्शन योजना लागू करणे यासाठी व अन्य प्रश्नांसाठी वर्कर्स फेडरेशन कायम लढा देईल.``

प्रकाशगंगा इमारत, मुंबई : महापारेषणचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगंगा इमारतीसमोर ध्वजारोहणप्रसंगी महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे.

प्रकाशगंगा इमारत, मुंबई : ध्वजारोहणप्रसंगी मानवंदना देताना वरिष्ठ अधिकारी वर्ग

महापारेषणमध्ये ७२ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

■ *टीम महापारेषण, मुंबई*

महापारेषणचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगंगा येथे ७२ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच `महापारेषण`च्या सात परिमंडळ कार्यालयांमध्येही प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रम घेण्यात आले.

प्रकाशगंगा येथील मुख्यालयात `महापारेषण`चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांनी ध्वजारोहण केले. यावेळी `महापारेषण`चे संचालक (प्रकल्प) सर्वश्री रवींद्र चव्हाण, संचालक (संचलन) संजय ताकसांडे, कार्यकारी संचालक (मा.सं.) (प्रभारी) सुगत गमरे, कार्यकारी संचालक (पारेषण) श्रीकांत राजूरकर, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) संजय कुमार, महाव्यवस्थापक (मानव संसाधन) सुधीर वानखेडे, मुख्य अभियंता शशांक जेवळीकर, कंपनी सचिव विनीता श्रीवाणी, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी अनंत पाटील, मुख्य विधी सल्लागार शिवाजीराव पाटील, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) मंगेश शिंदे, शिष्टाचार अधिकारी सतीश जाधव यांच्यासह वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रगतिपथावर असलेली कामे

यवतमाळ-पांढरकवडा वाहिनीवर लिलो पध्दतीने उभारणी

शिवाजी पार्क, मुंबई : प्रजासत्ताक दिनी मुख्य शासकीय समारंभात सहभागी झालेला ऊर्जा विभागाचा (महापारेषण) हा चित्ररथ.

नागपूर : अति उच्च दाब प्रकल्प नि संचलन व सुव्यवस्था परिमंडळ, नागपूर येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी मुख्य अभियंता श्रीमती जुईली वाघ यांच्यासमवेत अधिकारी व कर्मचारी वर्ग.

मुंबई : राज्याचे ऊर्जामंत्री डॉ. नितीन राऊत यांचा सत्कार करताना महापारेषणचे महाव्यवस्थापक (मा.सं.आस्थापना) श्री. राजू गायकवाड व सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. मंगेश शिंदे.

नागपूर : अति उच्च दाब प्रकल्प नि संवसु परिमंडळ, नागपूर येथे सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी मुख्य अभियंता श्रीमती जुईली वाघ, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. महेश सावंत, सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) श्री. पीयूष चिक्षे, कार्यकारी अभियंता (प्रशासन) श्रीमती प्रणोती बुंदाले, सहाय्यक मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी श्री. पी. बी. परचाके व अन्य अधिकारी व कर्मचारी वर्ग.

डोंबिवली : प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून अति उच्च दाब व संचलन व सुव्यवस्था विभाग डोंबिवलीचे कार्यालय नूतन वास्तूमध्ये स्थलांतरित करण्यात आले. याप्रसंगी वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. नासीर कादरी, कार्यकारी अभियंता श्री. सुधीर फुलारी, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) डॉ. शीतल गेडाम, अधीक्षक अभियंता (प्रभारी) श्री. मनोज जोशी, कार्यकारी अभियंता श्री. विजय आवारे यांच्यासह अन्य अधिकारी व कर्मचारी.

शिक्षण-प्रशिक्षण

■ प्रशिक्षणार्थ्यांची मोठी उपस्थिती ■

अकोला येथे विविध विषयांवर प्रशिक्षण शिबिर

■ *टीम महापारेषण, अकोला*

अमरावती परिमंडळांतर्गत ज्ञानप्रकाश प्रशिक्षण केंद्र, अकोला येथे विविध विषयांवर प्रशिक्षण घेण्यात आले.

यामध्ये नागपूर, औरंगाबाद, पुणे, वाशी, नाशिक, कराड व अमरावती येथील उपकार्यकारी व सहाय्यक अभियंत्यांना 'EHV Sub-Station Maintenance' या विषयावर प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये अमरावती परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. रोहिदास मस्के यांनी 'Sub-Station Earthing' या विषयावर मार्गदर्शन केले.

तसेच तांत्रिक कर्मचाऱ्यांकरिता कामाच्या ठिकाणी पाळावयाच्या सुरक्षिततेबाबत दोन दिवसीय शिबिर, 'EHV वाहिनी देखभाल' या विषयावर चार दिवसीय व 'Refresher Training' या विषयावर सहा दिवसीय प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. अभियंता कर्मचाऱ्यांना SAP PM या विषयावर तर 'प्रशिक्षण आपल्या दारी' अंतर्गत २२० के. व्ही. उपकेंद्रातील कर्मचाऱ्यांसाठी त्या उपकेंद्रामध्ये Know your sub station प्रशिक्षण घेण्यात आले.

प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी अधीक्षक अभियंता (प्रभारी) तथा प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख श्री. प्रवीण देशमुख, कार्यकारी अभियंता (प्रभारी) श्री. गजानन कोल्हे, प्रशिक्षण केंद्राचे उपप्रमुख तथा सहाय्यक महाव्यवस्थापक (मा. सं.) श्री. नितीन कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रशिक्षण केंद्राच्या समन्वयिका श्रीमती चारूलता काळे यांनी शिबिराचे व्यवस्थापन केले.

एकीचे बळ

■ *अधिकारी व कर्मचाऱ्यांनी काम केले अवघ्या ५३ तासांत पूर्ण* ■

नालासोपारा उपकेंद्रात ५० एमव्हीए ट्रान्सफॉर्मर-२ बसविला तात्काळ

■ *टीम महापारेषण, वाशी*

नालासोपारा उपकेंद्रात ५० एमव्हीए ट्रान्सफॉर्मर-२ ८० MVA PTR ने बदली करण्याचे काम महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अवघ्या ५३ तासांत पूर्ण केले. त्यांच्या या कामगिरीबद्दल सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

याप्रसंगी वाशी परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. नासीर कादरी व कळवा मंडळ कार्यालयाचे अधीक्षक अभियंता श्री. महेश भागवत यांनी प्रत्यक्ष उपकेंद्रात हजर राहून बदलीचे काम कर्मचाऱ्यांच्या मदतीने तात्काळ पूर्ण केले.

यापूर्वीही नालासोपारा उपकेंद्रात दिवाळी सणाच्या दरम्यान MVA PTR-३ च्या बदलीचे काम अवघ्या ६५ तासांत पूर्ण केले होते. तसेच CTR कंपनीचे Nitrogen Fire Extinguisher प्रणालीचे काम ६५ तासांमध्ये पूर्ण केले होते.

याकामी मुख्य अभियंता श्री. नासीर कादरी, अधीक्षक अभियंता श्री. महेश भागवत, बोईसर विभागातील कार्यकारी अभियंता (प्रभारी) श्री. राजेश दखणे, नालासोपारा उपकेंद्राचे श्री. विशाल लोखंडे यांनी परिश्रम घेतले.

नालासोपारा : *येथील उपकेंद्रात ५० एमव्हीए ट्रान्सफॉर्मर-२ ८० MVA PTR ने बदली करण्याचे काम महापारेषणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अवघ्या ५३ तासांत पूर्ण केले. त्याप्रसंगी मुख्य अभियंता श्री. नासीर कादरी, अधीक्षक अभियंता श्री. महेश भागवत, श्री. राजेश दखणे, श्री. विशाल लोखंडे व अन्य अधिकारी.*

प्रगतिपथावर असलेली कामे

पिंपळगाव-एकलहरे दुहेरी परिपथ वाहिनी

From the Desk of ED, HR

व्यक्तिमत्व विकास

व्यक्तीचा शारीरिक, मानसिक, भावनिक व सामाजिक विकास होत असतो. या विकासातून तिचा पिंड घडत असतो. व्यक्तिचा हा घडलेला पिंड म्हणजे व्यक्तिमत्व होय. व्यक्तिमत्व म्हणजे सामाजिक परिस्थितीत घडणाऱ्या व्यक्तीच्या वर्तनाची गोळाबेरीज होय. शरीराचा रंग व ठेवण, बुध्दी इत्यादी गोष्टी घेऊन व्यक्ती जन्माला येते. या गोष्टी तिला अनुवंशिकतेने मिळालेल्या असतात. व्यक्तीकडे असलेल्या उपजत अशा बाबींना जैविक बीजे म्हणता येईल. जीवन जगताना विविध बाह्य घटकांचा, प्रामुख्याने सामाजिक घटकांचा, व्यक्तीच्या विकासावर परिणाम होत असतो. जैविक बीजे आणि बाह्य घटक यांच्यातील आंतरक्रियेचा परिपाक म्हणजे व्यक्तीचे व्यक्तिमत्व होय.

व्यक्तिमत्व म्हणजे फक्त शारीरिक बाबीं नसून यामध्ये व्यक्तीचे आचार-विचार, संवाद हे घटक महत्त्वाचे असतात. गुणग्राहकता या गुणामुळे आपल्या व्यक्तिमत्व विकासात भर पडते. त्यासाठी आपल्याला आचार-विचार व संवादावर जाणीवपूर्वक लक्ष केंद्रित केले पाहिजे. यामधील पहिला घटक म्हणजे आचार. नम्रताशील, मितभाषी, स्पष्टता, उत्साही व सतर्कता या बाबी आपल्या चांगल्या आचाराचे गुण दर्शवित असतात. आपले वर्तन किंवा वर्तुणुकीतून आपल्या आचारांचे प्रकटीकरण होत असते. हे घटक विकसित करण्यासाठी आपल्या संपर्कात आलेल्या आदर्श आचारांच्या व्यक्तींचे अनुकरण करून ते गुण आपल्यामध्ये वृध्दींगत करण्याचा प्रयत्न करता आला पाहिजे.

दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे विचार आहे. किंबहुना, हा तर व्यक्तिमत्व विकासाचा कणा ठरतो. विचारांना घडविण्यासाठी आपण चांगल्या विचारांच्या सहवासात राहण्याचे प्रयत्न करावेत. यासाठी दर्जेदार व्याख्याने, पुस्तके किंवा प्रत्यक्ष सुसंवाद साधून आपण आपल्या विचारांना विकसित करू शकतो. 'विचार बदला तर नशीब बदलेल' यासाठी तर म्हटले आहे. विचारांची व्याप्ती अमर्याद आहे. विचाराअंती चांगली वाणी व वर्तन घडत असते. विचारांमुळे प्रगल्भता येते. हे केवळ आपल्या आचार व सुसंवादाच्या माध्यमातून शक्य आहे. त्यामुळे विचार हा या प्रक्रियेचा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे.

तिसरा महत्त्वाचा घटक म्हणजे सुसंवाद. आपण काय बोलतो? त्याचबरोबर आपण कसे बोलतो? हे सुध्दा तितकेच महत्त्वाचे असते. किंबहुना, शब्द ३० टक्के आणि बोलण्याची पध्दत ७० टक्के असे संवादामध्ये समीकरण राहते. त्यामुळे आपल्या बोलण्याच्या पध्दतीवर विशेष भर देणे गरजेचे आहे. शब्द हे दुधारी शस्त्र असल्याने ते जपून वापरणे गरजेचे आहे. शब्दांमध्ये प्रचंड सामर्थ्य असते. त्यामुळे शब्दांची निवड विषयानुरूप जाणीवपूर्वक करणे गरजेचे ठरते. अनेकवेळा संवादामुळे वाद-विवाद झालेला आपण पाहतो. विनाकारण आपण एकमेकांपासून दुरावतो. त्यासाठी बोलताना शब्द जपून वापरता आले पाहिजे. ज्यांचे शब्दसामर्थ्य अफाट त्यांचा संवाद अत्यंत प्रभावी ठरतो, म्हणून शब्दसामर्थ्य वाढविण्यासाठी आपण जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. समज-गैरसमज, वाद-विवाद केवळ सुसंवादामुळेच आपण टाळू शकतो, हे उघड सत्य आहे.

संयम, सहिष्णूता, सर्जनशीलता हे घटक व्यक्तिमत्व विकासाला मुलामा देण्याचे कार्य करतात. त्याचबरोबर आपली शारीरिक ठेवण आपल्याला चांगल्या प्रकारे जोपासता आली पाहिजे. त्यानंतरचा महत्त्वाचा घटक म्हणजे कपडे. 'एक नूर आदमी और दस नूर कपडा' असे म्हटले जाते. आपण योग्य ते कपडे परिधान केले तर आपले व्यक्तिमत्व उठून दिसते. शरीर स्वच्छ ठेवणे, योग्य केशरचना करणे, नीटनेटके कपडे वापरणे हे प्रत्येकाच्या हातात आहे. या गोष्टीमुळे व्यक्तिमत्व उठून दिसते. आपली वृत्ती आनंदी ठेवणे व गोड बोलणे फारसे कठीण नाही.

आपण आपले व्यक्तिमत्व सुधारण्यासाठी अनेक थोर व्यक्तींचे जीवनचरित्र वाचत राहिले पाहिजे. थोर व्यक्तींनी आपले जीवन कसे घडविले, त्यांनी कोणकोणते कार्य केले आहे. आपले स्वतःचे जीवनमान कसे उंचावले आहे, यावरून आपण आपले सुद्धा व्यक्तिमत्व सुधारू शकतो.

व्यक्तिने आपल्या गुणदोषांची योग्य दखल घेऊन त्यात योग्य असे बदल करण्याचा सतत प्रयत्न केला तर व्यक्तिमत्वाची सुधारणा बऱ्याच प्रमाणात होऊ शकते. मला आशा आहे की, आपण यासाठी जागरूक राहून आपले व्यक्तिमत्व विकसित करण्यासाठी प्रयत्न कराल.

शुभेच्छांसह..!

– सुगत गमरे

कार्यकारी संचालक (मानव संसाधन) (प्रभारी)

संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)
E-mail : prohr@mahatransco.in
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by **PRO** for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts:** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka,
W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai-400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai-400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.